**महाराष्ट्र शासन**
**उच्च शिक्षण संचालनालय**
## शिक्षण शुल्क समिती, मुंबई
(राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)
कार्यालयाचा पत्ता- शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,
१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाब, मुंबई-४०० ००१
Web:www.sssmumbai.org Tel-022 22694478 E-mail : sssbedmed@gmail.com/jd.hesss-mh@gov.in

**विषय:- दि.०३.१२.२०१८ रोजी सकाळी ११:०० वाजता मा. अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती तथा सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई, शासकीय अध्यापक महाविद्यालय, एल्फिस्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाब, मुंबई - येथे शासकीय अध्यापक महाविद्यालयातील प्राचार्यांच्या दालनामध्ये पार पडलेल्या शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीचे इतिवृत्त ..**

**सदर बैठकीस खालील अधिकारी/पदाधिकारी उपस्थित होते.**

| अ.क्र. | **उपस्थित अधिकारी/ पदाधिकारी** | **पदनाम** |
|---|---|---|
| २ | श्री. संतोष परब, सनदी लेखापाल | सदस्य |
| ३ | श्रीमती नलिनी पाटील, खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी, (शिक्षणशास्त्र) | सदस्य |
| ४ | डॉ. रविंद्र कडू, खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी (शारिरीक शिक्षणशास्त्र) | सदस्य |
| ५ | डॉ. सुशीलकुमार चोधरी, सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई | सदस्य |
| ६ | मा. डॉ. धनराज माने- संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य सचिव |
| ७ | मा. रोहिणी भालेकर, उप सचिव, उच्च शिक्षण, मंत्रालय, मुंबई | विशेष निमंत्रित |

मा. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय यांचे प्रतिनिधी, प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई तसेच डॉ. तुकाराम गाढवे, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय तज्ज्ञ (निमंत्रित) हे बैठकीस अनुपस्थित होते.

**या बैठकीत घेण्यात आलेले महत्त्वाचे मुद्देनिहाय निर्णय खालीलप्रमाणे......**

**१. मुद्दा क्र. १ राज्यातील शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या शै. वर्ष २०१७-१८ च्या तज्ज्ञांकडून तपासणी झालेल्या शुल्कास मान्यता मिळणेबाबत.**

शिक्षण शुल्क समितीने नियुक्त केलेल्या तज्ज्ञांनी छाननीअंती निश्चित केलेले बी. एड., एम. एड., बी. पी. एड. व एम. पी. एड. या अभ्यासक्रमाचे (महाविद्यालयांचे) शै. वर्ष २०१७-१८ चे एकूण १५ प्रस्ताव समितीसमोर मान्यतेसाठी ठेवण्यात आले होते. समितीने सदर प्रस्तावापैकी १० टक्के वाढ ते २५ टक्के घट पर्यंत मर्यादेत शिक्षण शुल्कात वाढ देण्याची शिफारस केलेले प्रस्ताव मंजूर करण्यात आले. शुल्क निश्चितीच्या बाबतीत समितीने एकमताने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

१. **परिशिष्ट अ** मध्ये बैठकीत ठेवलेल्या ११ प्रस्तावांपैकी नमुद ०७ (अ.क्र. ०२, ०३, ०५, ०६, ०८, ०९ व १० ) बी. एड. अभ्यासक्रमांच्या/महाविद्यालयांच्या उपसमितीने निश्चित/अंतीम केलेल्या शुल्काला शिक्षण शुल्क समितीची मंजूरी देण्यात आली.
२. **परिशिष्ट ब** उर्वरित बी. एड. अभ्यासक्रमांच्या / महाविद्यालयांच्या ०४ प्रस्तावातील (अ.क्र. ०१, ०४, ०७ व ११) शुल्कामध्ये २५ टक्क्यांपेक्षा जास्त घट होत असल्यामुळे संबंधीत महाविद्यालयांना नोटीस देऊन कळवावे. योग्य ती माहिती मागवून प्रस्तावांची पुनर्छाननी करून ती पुढील बैठकीत ठेवण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला.
३. **परिशिष्ट क** बैठकीत ठेवलेल्या पुणे विद्यापीठाच्या इंटीग्रेटेड बी.एस्सी -बी. एड अभ्यासक्रमाच्या शुल्कास शिक्षण शुल्क समितीची मंजूरी देण्यात आली.
४. **परिशिष्ट ड** बैठकीत ठेवलेल्या एम. एड अभ्यासक्रमाच्या ०१ महाविद्यालयांच्या प्रस्तावांत २५ टक्क्यांपेक्षा जास्त घट असल्यामुळे संबंधीत महाविद्यालयांना नोटीस देऊन कळवावे. योग्य ती माहिती मागवून प्रस्तावांची पुनर्छाननी करून ती पुढील बैठकीत ठेवण्यात यावी, असे ठरले.
५. **परिशिष्ट इ** बैठकीत ठेवलेल्या एम. पी. एड अभ्यासक्रमाच्या ०१ महाविद्यालयाच्या शुल्कास शिक्षण शुल्क समितीची मंजूरी देण्यात आलेली आहे.
६. **परिशिष्ट फ** बैठकीत ठेवलेल्या भारतीय पूनर्वास परिषदेची मान्यता असलेल्या विशेष बी. एड अभ्यासक्रमाच्या ०१ महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमाच्या शुल्कास शिक्षण शुल्क समितीची मंजूरी देण्यात आलेली आहे.

**२. दि.०३.०४.२०१८ च्या बैठकीत पूनर्तपासणीसाठी ठेवलेल्या महाविद्यालयांच्या शै. वर्ष २०१६-१७ च्या शुल्कास मान्यता मिळणेबाबत.**

:- ज्या महाविद्यालयांच्या शुल्कात मागील वर्षापेक्षा ५० टक्क्यापेक्षा अधिक घट झाली आहे, अशा महाविद्यालयांकडून परत आवश्यक ती कागदपत्रे मागवून त्यांच्या प्रस्तावांची खर्च लेखापालाकडून पूनर्तपासणी करण्यात आली. अशा महाविद्यालयांच्या शै. वर्ष २०१६-१७ च्या शुल्कास शिक्षण शुल्क समितीची मंजूरी देण्यात आली.

**१. परिशिष्ट ग** बैठकीत ठेवलेल्या बी. एड अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयाच्या एकूण ०७ पैकी ०६ महाविद्यालयांच्या शुल्कास अंतिम मान्यता देण्यात आली.

**२.परिशिष्ट ह** बैठकीत ठेवलेल्या बी. एड अभ्यासक्रमाच्या उर्वरित ०१ महाविद्यालयाच्या (अ.क्र.०६) प्रस्तावात शुल्कात असलेल्या विसंगतीमुळे संबंधीत महाविद्यालयांना नोटीस देऊन कळवावे. महाविद्यालयाची पुनर्छाननी करावी. अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील बैठकीत ठेवण्यात यावी असे ठरले.

**३.परिशिष्ट ई** बैठकीत ठेवलेल्या एम. एड अभ्यासक्रमाच्या ०४ महाविद्यालयांच्या शुल्कास शिक्षण शुल्क समितीची मंजूरी देण्यात आली.

**४.परिशिष्ट ज** बैठकीत ठेवलेल्या बी. पी. एड अभ्यासक्रमाच्या ०१ महाविद्यालयाच्या शुल्कास शिक्षण शुल्क समितीची मंजूरी देण्यात आली.

**स्वायत्त महाविद्यालये/संस्था तसेच विद्यापीठाचे विभाग येथे विनाअनुदानित तत्त्वावर असणाऱ्या शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाचे शुल्क निश्चितीचे अधिकार त्यांना आहे किंवा कसे याबाबत विधी व न्याय विभाग, मंत्रालय यांच्याकडून शिक्षण शुल्क समिती त्यांचे शुल्क निश्चित करून देईल, असे अभिप्राय प्राप्त झालेले आहेत. या अभिप्रायाच्या अनुषंगाने विद्यापीठाचे शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र केंद्रातील विनाअनुदानित अभ्यासक्रमास सन २०१६-१७ च्या शिक्षण शुल्कास खालीलप्रमाणे शिक्षण शुल्क समितीची मंजूरी देण्यात आली.**

**५.परिशिष्ट ल** बैठकीत ठेवलेल्या ०२ विद्यापीठाच्या एम. एड अभ्यासक्रमाच्या शुल्कास शिक्षण शुल्क समितीची मंजूरी देण्यात आली.

**६. परिशिष्ट म** बैठकीत ठेवलेल्या ०१ विद्यापीठाच्या एम. पी. एड अभ्यासक्रमाच्या शुल्कास शिक्षण शुल्क समितीची मंजूरी देण्यात आली.

३. **किसनराव खोब्रागडे शिक्षण महाविद्यालय, आरमोरी जि. गडचिरोली या महाविद्यालयातील बी.एड अभ्यासक्रमाच्या शुल्कात मागील वर्षापेक्षा ५० टक्क्यापेक्षा अधिक ऋणात्मक वाढ झाली असल्यामुळे समितीने पुनर्तपासणीसाठी ठेवले आहे. महाविद्यालयाकडून समितीने ठरवून दिलेले शुल्क मान्य करून मिळणेबाबत विनंती केलेली आहे, तरी याबाबत निर्णय व्हावा.**

:- महाविद्यालयाची विनंती अमान्य करून शिक्षण शुल्क समितीने या बैठकीत मंजूर करून दिलेले शुल्कच अंतिम राहील असा निर्णय घेण्यात आला.

४. **कॉलेज ऑफ एज्युकेशन फॉर वूमेन, कुर्डूवाडी या महाविद्यालयातील बी.एड अभ्यासक्रमाच्या शुल्कात मागील वर्षापेक्षा ५० टक्क्यापेक्षा अधिक ऋणात्मक वाढ झाली असल्यामुळे समितीने पुनर्तपासणीसाठी ठेवले आहे. परंतु व अशा महाविद्यालयाने अंतिम मंजूर शुल्क मान्य करून मिळणेबाबत विनंती केलेली आहे, तरी याबाबत निर्णय व्हावा.**

:- महाविद्यालयाची विनंती अमान्य करून शिक्षण शुल्क समितीने या बैठकीत मंजूर करून दिलेले शुल्कच अंतिम राहील असा निर्णय घेण्यात आला.

**५. अनुराग अध्यापक महाविद्यालय, वरठी, जि . भंडारा या महाविद्यालयातील एम.एड अभ्यासक्रम हा एन.सी.टी.ई. ने सत्र २०१८-१९ पासून बंद करण्याचा आदेश दिलेला आहे. परंतु त्यांनी शै.वर्ष २०१६-१७ साठी सादर केलेल्या प्रस्तावाचे शिक्षण शुल्क मंजूर करून मिळणेबाबत विनंती महाविद्यालयाकडून करण्यात आलेली आहे, तरी योग्य निर्णय व्हावा.**

:- महाविद्यालयाची विनंती मान्य करून या महाविद्यालयाचे सन २०१६-१७ चे शुल्क मंजूर करून दयावे, असा निर्णय झाला. (परिशिष्ट न)

**६. राज्यातील विशेष बी.एड, एम.एड अभ्यासक्रमाबाबत असणाऱ्या अडचणीबाबत चर्चा करण्यासाठी समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार संचालनालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. परंतू केवळ दोन महाविद्यालये उपस्थित होती. पैकी एकाच महाविद्यालयाने शुल्क निश्चितीचा प्रस्ताव सादर केलेला आहे.**

:- विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेकडून प्रत्येक विभागात असलेल्या विशेष बी.एड एम. एड महाविद्यालयांची तपासणी करावी व त्याचा अहवाल मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना सादर करावा, असा निर्णय झाला.

**७. राज्यातील इंटीग्रेटेड शिक्षणशास्त्र (बी.ए.बी.एड व बी.एस्सी.बी.एड ) अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या उपसमितीकडून तयार करण्यात आलेल्या व त्यावर सूचना हरकती मागविलेल्या निर्धारण नमुना अर्ज व नियमावलीस मान्यता मिळावी व या उपसमितीने सांगोपांग विचार करून अभ्यासक्रमासाठी सन २०१७-१८ साठी शिफारस केलेले किमान अंतरिम शुल्क मंजूर करून मिळणेबाबत.**

:-राज्यातील इंटीग्रेटेड शिक्षणशास्त्र (बी.ए.बी.एड व बी.एस्सी.बी.एड) अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या उपसमितीकडून तयार करण्यात आलेल्या व त्यावर सूचना हरकती मागविलेल्या निर्धारण नमुना अर्ज व नियमावलीस मान्यता देण्यात आली तसेच **इंटीग्रेटेड शिक्षणशास्त्र (बी.ए.बी.एड व बी.एस्सी.बी.एड )** अभ्यासक्रमासाठी सन २०१७-१८ साठी रू.२०,०००/- एवढे अंतरिम शुल्क मंजूर करून दिले आहे, पुढील वर्षापासून शुल्क मंजूर करून घेण्यासाठी शिक्षण शुल्क समितीकडे प्रस्ताव सादर करावा असे ठरले.

**८. याचिका क्रमांक. ६९७६/२०१७ मायनॉरिटी बी. एड कॉलेज मॅनेजमेंट असोसिएशन, औरंगाबाद विरूध्द महाराष्ट्र शासन व इतर ही याचिका निकाली काढलेली आहे. दि.०३-०४-२०१८ च्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार विधी व न्याय विभागाकडून याबाबत मत प्राप्त करावे, असा निर्णय झालेला आहे, परंतू विधी व न्याय विभागाचा निर्णय अद्यापपर्यंत प्राप्त झालेला नाही.**

:- विधी व न्याय विभागाचे अभिमत प्राप्त करून घेण्यासाठी पाठपुरावा करावा.

९. **शासकीय अध्यापक महाविद्यालय, बुलडाणा मधील एम.एड स्वयंसहाय्यित अभ्यासक्रमास केंद्रिय प्रवेश प्रक्रियेव्दारे अतिअल्प नोंदणी होवून कमी प्रवेश झाल्याने याही वर्षी मागील वर्षाप्रमाणे अंतरिम शुल्क रूपये २०००० + २००००=४०००० प्रति विद्यार्थी विशेषबाब म्हणून मान्य करण्याबाबत.**

:- शासकीय अध्यापक महाविद्यालय, बुलडाणा मधील एम.एड स्वयंसहाय्यित अभ्यासक्रमास केंद्रिय प्रवेश प्रक्रियेव्दारे शै.वर्ष २०१८-१९ साठी अतिअल्प नोंदणी होवून कमी प्रवेश झाले आहेत. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेकडून महाविद्यालयांची तपासणी करावी, त्याचा अहवाल मा. संचालक, उच्च शिक्षण यांना सादर करावा. त्यानंतर मा. संचालक, उच्च शिक्षण यांनी अंतरिम शुल्क मंजूर करून दयावे.

१०. **शांतीनिकेतन कॉलेज ऑफ एज्युकेशन (एम.एड), नागपूर यांनी सत्र २०१३-१४ व २०१४-१५ या वर्षाचे शिक्षण शुल्क मंजूर करून मागीतली आहे, परंतु त्यावेळेस समिती अस्तित्वात नसल्यामुळे याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात यावा.**

:- सत्र २०१३-१४ व २०१४-१५ या वर्षी शुल्क निश्चितीची कार्यवाही न झाल्याने आता शुल्क मंजूर करून देता येणार नाही असा निर्णय झाला.

११. **नवगण शिक्षण संस्था , राहुरी चे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, बीड या महाविद्यालयाला सन २०१६-१७ साठी एम. पी. एड अभ्यासक्रमाचे मंजूर केलेले शुल्क रू.१५,५३०/- कमी असल्यामुळे एम. पी. एड अभ्यासक्रमासाठी प्रति वर्षी २२,०००/- एवढे शुल्क निश्चित करून मिळणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे.**

:- महाविद्यालयाची विनंती अमान्य करून शिक्षण शुल्क समितीने दि.०३.०४.२०१८ च्या बैठकीत मंजूर करून दिलेले शुल्कच अंतिम राहील असा निर्णय घेण्यात आला.

१२. **आतापर्यंत शिक्षण शुल्क समितीकडून एकदाही शुल्क निश्चिती न केलेल्या शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या शुल्काबाबतीत निर्णय होणेबाबत.**

:- आतापर्यंत एकदाही शिक्षण शुल्क समितीकडून शुल्क निश्चिती करून घेतलेली नाही अशा महाविद्यालयांच्या बाबतीत शुल्क नियामक प्राधिकरण यांचेकडे काय निर्णय घेतात, याची माहिती मिळवावी. तसेच अशा महाविद्यालयांचे विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेमार्फत तपासणी केलेले अहवाल संबंधीत विभागीय कार्यालयांकडून प्राप्त करून घ्यावेत, त्यानंतर ॲडहॉक शुल्काबाबत पुढील बैठकीत प्रस्ताव ठेवण्यात यावा.

१३. **श्री. बाणेश्वर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बुऱ्हाणनगर, ता. जि. अहमदनगर यांनी २०१६-१७ साठी समितीने ठरवून दिलेल्या शिक्षण शुल्कात वाढ करून मागीतली आहे.**

:-महाविद्यालयाची विनंती अमान्य करून शिक्षण शुल्क समितीने दि.०३-०४-२०१८ च्या बैठकीत मंजूर करून दिलेले शुल्कच लागू राहील असे ठरले.

**१४.पद्मावती अध्यापक महाविद्यालय, आघूर, जि. औरंगाबाद यांनी व अशा इतर महाविद्यालयांनी वर्ष २०१६-१७ साठी समितीने मंजूर करून दिलेले शुल्क कमी असल्यामुळे शै.वर्ष २०१५-१६ चे शुल्क मान्य करून मिळणेबाबत विनंती केलेली आहे.**

:-महाविद्यालयाची विनंती अमान्य करून शिक्षण शुल्क समितीने दि.०३-०४-२०१८ च्या बैठकीत मंजूर करून दिलेले शुल्कच लागू राहील असे ठरले.

**१५.श्री. हनुमान व्यायाम प्रसारक डिग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन, अमरावती या स्वायत्त महाविद्यालयाच्या समितीने मंजूर करून दिलेले शुल्क २०१५-१६ चे शुल्क म्हणून ग्राहय धरून शुल्कात वाढ करून मागीतली आहे.**

:- या स्वायत्त महाविद्यालयाकडून सन २०१६-१७ करिता पुन:श्च प्रस्ताव मागविण्यात यावा. स्वायत्त संस्था म्हणून विद्यापीठाच्या शुल्क निर्धारणाचे नियमान्वये महाविद्यालयातील व्यवस्थापन समितीच्या ठरावानुसार शिक्षण शुल्काचा आधार घेवून बी.पी.एड अभ्यासक्रमाकरिता व एम.पी.एड अभ्यासक्रमाकरिता शिक्षण शुल्क समितीचे मुद्दे विचारात घेवून, शुल्क निश्चिती करावी. शिक्षण शुल्क समितीच्या पुढील बैठकीत शुल्क निश्चितीकरिता ठेवावे.

**१६. बळीरामदादा बनसोडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चळे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर यांनी सन २००९-१० चे ॲडहॉक शुल्क यावर्षासाठी मान्य करून मिळणेबाबत विनंती केलेली आहे.**

:- आतापर्यंत एकदाही शिक्षण शुल्क समितीकडून शुल्क निश्चिती करून घेतलेली नाही अशा महाविद्यालयांच्या बाबतीत शुल्क नियामक प्राधिकरण यांचेकडे काय निर्णय घेतात, याची माहिती मिळवावी. तसेच अशा महाविद्यालयांचे विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेमार्फत तपासणी केलेले अहवाल संबंधीत विभागीय कार्यालयांकडून प्राप्त करून घ्यावेत, त्यानंतर ॲडहॉक शुल्काबाबत पुढील बैठकीत प्रस्ताव ठेवावा.

**१७.शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीसाठी दि.०३-०१-२०१७ च्या बैठकीत मा. अध्यक्षांनी नेमलेले तज्ज्ञ डॉ. तुकाराम गाढवे, सहायक प्राध्यापक, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई यांनी तपासलेल्या प्रस्तावांचे मानधन देण्यास परवानगी मिळणेबाबत.**

:- शिक्षण शुल्क समितीच्या दि.०३-०१-२०१७ च्या बैठकीत खर्च लेखापालाकडून तयार करून घेण्यात आलेल्या छाननी अहवालाची अंतिम तपासणी करण्याकरिता डॉ. तुकाराम गाढवे, सहायक प्राध्यापक, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई यांना तज्ज्ञ म्हणून निमंत्रित करावे व त्यांनी समितीच्या बैठकीसाठी देखील उपस्थित रहावे, असे नमुद करण्यात आले. तरी समितीचे शिक्षणशास्त्र तज्ज्ञ, शारिरीक शिक्षणशास्त्र तज्ज्ञ, सनदी लेखापाल/खर्च लेखापाल यांना प्रस्ताव तपासणीसाठी देण्यात येणाऱ्या मानधनाप्रमाणे रू. ३६०/- प्रति प्रस्ताव मानधन देण्यात यावे, असा निर्णय झाला.

**१८.शै.वर्ष २०१६-१७ व २०१७-१८ ला शुल्क निश्चित केलेली महाविद्यालये वगळता उर्वरित महाविद्यालयांकडून सन २०१८-१९ साठी प्रस्ताव मागविण्यासाठी समितीची मान्यता मिळणेबाबत.**

:- शै.वर्ष २०१६-१७ व २०१७-१८ ला शुल्क निश्चिती न केलेल्या महाविद्यालयांचे प्रस्ताव मागविण्यात यावेत, असा निर्णय झाला.

**१९. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी उपस्थित होणारे विषय.**

१. शिक्षण शुल्क समितीतील सदस्य श्री. संतोष परब, सनदी लेखापाल, डॉ. नलिनी पाटील, खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेच्या प्रतिनिधी, डॉ. सुशीलकुमार चौधरी, सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती व प्रस्ताव तपासणीसाठी नेमलेले श्री. धनाजी वासके, खर्च लेखापाल इत्यादींची उपसमिती नेमून शुल्क निश्चितीसाठी तयार करण्यात आलेले सूत्र यामध्ये सुधारणा कराव्यात. समान नॉर्मस यावेत यासाठी शिफारशी करव्यात. विभागीय सहसंचालकांनी केलेल्या महाविद्यालयाचे Physical Verification चा अहवाल संचालनालयाकडून प्राप्त करून घ्यावा. महाविद्यालयात अभ्यासक्रम चालविण्यासाठी किती खर्च येवू शकतो, याचा अंदाज तयार करणे. महाविद्यालयात गत ३ वर्षाची प्रवेशित विद्यार्थी संख्या प्राप्त करणेबाबत, विद्यार्थ्यांनी भरलेल्या फीबद्दल पावतीची प्रत प्राप्त करणेबाबत.

२. किती नोंदणीकृत महाविद्यालये शिक्षण शुल्क समितीकडे आली, किती बाकी आहेत याची माहिती पुढील बैठकीत सादर करावी.

३. विकास शुल्क (Development Fee) मंजूर करण्यापूर्वी त्या महाविद्यालयाचे अंदाजपत्रक/भविष्यातील योजना (Budget/Future Plans) तपासावे, विकासासाठी किती खर्च करण्यात आला/येतो त्यानुसार विकास शुल्काबाबत निर्णय घेण्यात आला.

४. संख्याशास्त्रज्ञ नेमून त्यांच्याकडून पूर्वी मंजूर केलेल्या शुल्काबाबत ग्राफीकल प्रेझेंटेशन तयार करावे.

५. सर्व महाविद्यालयांचे मंजूर शुल्क विचारात घेवून सरासरी शुल्क किती येते याची माहिती घ्यावी. पूर्वीची ३ वर्षापर्यंतची सरासरी फी काढावी.

६. एखादे महाविद्यालय प्रमाण मानून त्याच्याशी तुलनात्मक माहिती सादर करावी.

आभार प्रदर्शनानंतर मा. अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती, मुंबई तथा मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या परवानगीने बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव,
शिक्षण शुल्क समिती तथा
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
पुणे

अध्यक्ष,
शिक्षण शुल्क समिती तथा
सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई